| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | – | ०१.०१.२०२६ |
| नोंदणी दिनांक | – | ०१.०१.२०२६ |
| निकाल दिनांक | – | १३.०३.२०२६ |
| कालावधी – ०० व. ०२ म. १२ दि. | | |

<table>
<tr><td rowspan="2">MHRG140000012026<br>-</td><td colspan="2"><u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उरण, ता. उरण, जि. रायगड यांचे न्यायालयात</u><br><br>(पिठासीन अधिकारी : एम. एस. काझी)<br>(न्यायनिर्णय दिनांक १३.०३.२०२६ रोजीचा)<br><br>नियमीत फौजदारी खटला क्र. १/२०२६<br>नि.क्र. २४/ब</td></tr>
<tr><td colspan="2">उरण पोलीस ठाणे येथील गुन्हा नोंद क्र.२४१/२०२५<br>भारतीय दंड विधान कलम ३३१ (४) व ३०५ अन्वये</td></tr>
<tr><td>सरकार पक्ष / फिर्यादी</td><td></td><td>महाराष्ट्र शासन<br>उरण पोलीस ठाणे तर्फे<br>श्री. विजेंद्र विजय गावंड</td></tr>
<tr><td>विधिज्ञ</td><td></td><td>सहाय्यक सरकारी अभियोक्ता,<br>श्री. पी. बी. देशमाने</td></tr>
<tr><td>आरोपी</td><td></td><td>विजेंद्र विजय गावंड,<br>वय ३३ वर्षे, व्यवसाय – नोकरी,</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | सध्या राहणार– रूम नं.०२, राजाराम अपार्टमेंट, काल्हेर गाव, भिवंडी, जिल्हा ठाणे.<br>मुळ राहणार – मु. पिरकोन, पो. आवरे, ता. उरण, जि. रायगड. |
| विधिज्ञ | | आरोपी तर्फे ॲडव्होकेट निकिता कासारे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०५.०९.२०२५ ते ०६.०९.२०२५ |
| फिर्याद दाखल तारीख | ०६.०९.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०१.०१.२०२६ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ३१.०१.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ११.०३.२०२६ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | १२.०३.२०२६ |
| निकालाची तारीख | १३.०३.२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, जर शिक्षा झाली असेल तर | -- |

| आरोपीचा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष | काय शिक्षा दिली | फौ.प्र.सं. च्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मुक्त | | आरोपीचा कारागृहातील कालावधी |
| १ | विजेंद्र विजय गावंड | ०३.११.२०२५ | -- | भा.दं.वि. कलम ३३१ (४) व ३०५ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | १३० दिवस |

## साक्षीदारांची यादी

**अ. अभियोगपक्ष –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र. १ | विशाल धनंजय ठाकुर | फिर्यादी | २३ |

**ब. आरोपी साक्षीदार, जर असेल तर –**

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालयाचा साक्षीदार, जर असेल तर –**

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## निशाण्यांची यादी

**अ. अभियोगपक्ष –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**ब. आरोपीपक्ष –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालयाची निशाणी –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १९ | दोषारोप |

**ड. महत्वाच्या बाबी –**

| अनु.क्र. | महत्वाच्या बाबी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

## न्यायनिर्णय

## (जाहीर दिनांक १३.०३.२०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३३१(४) व ३०५ अन्वये आरोप निश्चित करुन खटला चालविणेत आला.

अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे,

२. सदरची घटना ही दिनांक ०५.०९.२०२५ रोजी रात्री ०८.३० वाजताचे सुमारास ते दिनांक ०६.०९.२०२५ रोजी सकाळी ०६.०० वाजताचे दरम्यान घर नं.११३१, एचपी पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, मु. खोपटे, पो. कोप्रोली, ता. उरण येथे घडली. आरोपीने फिर्यादी यांच्या राहत्या घराच्या दरवाजाची कडी कोयंडा तोडुन आत प्रवेश करून आतील रूममधील असलेल्या लोखंडी कपाटातील एकुण २,५९,०००/- रूपयाचे सोन्याचे दागीने, एक भारत गॅस सिलेंडर टाकी, रोख रक्कम व एक सॅमसंग कंपनीचा जुने बंद अवस्थेतील फोन असा माल घरफोडी चोरी केली म्हणुन, म्हणून फिर्यादीने प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उरण पोलीस ठाणे मध्ये आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३३१ (४) व ३०५ अन्वये शिक्षापात्र अपराधासाठी गुन्हा रजि.नं. २४१/२०२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक नितीन खाडे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी पंचनामा केला, साक्षीदारांची टिपणे नोंदवली. तपासाअंती त्यांनी प्रस्तुतच्या आरोपीविरुध्द सबळ पुरावा आढळून आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३३१ (४) व ३०५ खालील शिक्षापात्र अपराधासाठी नि.क्र.१९ कडे आरोप निश्चित केले, ते आरोपीला वाचून

दाखविले व मराठीत समजावून सांगितले, आरोपीने त्याला गुन्हा कबुल नसल्याचे सांगून संपरिक्षा चालविण्याची विनंती केली. अभियोग पक्षाचा पुरावा झाल्यानंतर आरोपीविरूद्ध कुठलाही गुन्हादर्शक पुरावा मिळुन न आल्याने त्याचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे जबाब नोंदवण्यात आला नाही.

५. वरील सर्व बाबींचा विचार करता या प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी माझे पुढे उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | दिनांक ०५.०९.२०२५ रोजीचे रात्री ०८.३० ते दिनांक ०६.०९.२०२५ सकाळी ०६.०० वाजेपर्यंत घर नं.११३१, एचपी पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, मु. खोपटे, पो. कोप्रोली, ता. उरण येथे आरोपीने फिर्यादीच्या घरात चोरटे गृह अतिक्रमण करून भा.न्या.सं. कलम ३३१ (४) अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने रात्रीच्या वेळी घरफोडी करून फिर्यादीच्या घरातुन सोने, गॅस सिलेंडर, रोख रक्कम व एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल चोरून भा.न्या.सं. कलम ३०५ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | अंतिम आदेश काय ? | – | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ व २ करीता –

६. आरोपीवर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्याकरता अभियोग पक्षाने फिर्यादी विशाल धनंजय ठाकुर (निशाणी २३) यास साक्षीदार क्र.१ म्हणून तपासले. अभियोग पक्षाचे सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यादरम्यान असे कथन केले की, दिनांक ०६.०९.२०२५ रोजी काय घटना घडली होती हे त्यांना आठवत नाही तसेच आठवण करून दिल्यास सांगता येणार नाही. पुराव्यात त्यांना त्यांनी दिलेली फिर्याद दाखवली असता त्याने सही मान्य करून त्यातील मजकुर बरोबर माहित नसल्याचे कथन केले. सहाय्यक सरकारी वकीलांनी साक्षीदार सरकारी पक्षाला सहकार्य करत नसल्याचे सांगून उलटतपासात विचारता येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. त्यात फिर्यादीने त्याची व आरोपीची तडजोड राजीखुशीने झाली असून त्यांना आरोपीविरूद्धची केस काढून टाकायची असल्याचे कथन केले.

७. तपासादरम्यान सादर करण्यात आलेल्या पुरावा व साक्षीदारांच्या कथनांतून असे स्पष्ट होते की, साक्षीदाराने दावा केलेल्या चोरीचे प्रत्यक्षदर्शी किंवा ठोस

पुरावे दिले नाहीत आणि त्यांनी स्वतः हे दृश्य प्रत्यक्ष पाहिले नव्हते. घरफोडी, रात्रीच्या वेळी लपून प्रवेश, चोरी करण्याचा हेतू यांसारख्या घटकांना सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने पुराव्याद्वारे आवश्यक तथ्ये पुरविली नाहीत. त्यामुळे भा.न्या.सं. कलम ३३१ (४) व ३०५ अंतर्गत दोष सिद्ध करण्यासाठी आवश्यक घटक पुराव्यांद्वारे सिद्ध झाले नाहीत. तसेच फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्याचे पुराव्यात कुठेही या आरोपीने त्यांच्या घरातुन सोने, गॅस सिलेंडर, रोख रक्कम व एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल चोरी केल्याचे किंवा सदर गोष्टी आरोपीच्या ताब्यातुन मिळाल्याचे कथन केले नाही, संक्षिप्तरित्या फिर्यादीच्या पुराव्यात आरोपीचा चोरीशी संबंध कशा पद्धतीने आला याबाबत काहीच कथन आले नाही.

८. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपीचा गुन्हयाशी संबंध जोडणारा कोणताही पुरावा अभियोगपक्षाने सादर केलेला नाही. पुरेशी संधी देउनही अभियोगपक्षाने स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेले नाहीत. पटलावरील अभिलेख पाहता फिर्यादी व आरोपीची आपसात तडजोड झाल्याचे दिसते. आरोपीविरूद्ध कुठलाही पुरावा आलेला नसल्याने त्याच्यावर लावलेले कोणेतेही आरोप सिध्द होत नाहीत. त्यामुळे फिर्यादनुसार आरोपीने फिर्यादीच्या घरात रात्री घरफोडी करून चोरी केली यासंदर्भात अभियोगपक्ष काहीएक

पुरावा सादर करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन प्रस्तुतच्या खटल्यामध्ये अभियोगपक्षाने सादर केलेला एकंदरीत पुरावा लक्षात घेता प्रस्तुत आरोपीवर ठेवण्यात आलेले भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (४) व ३०५ अन्वयेचे दोषारोप निर्विवादपणे सिध्द करण्यामध्ये अभियोगपक्षाला अपयश आले आहे. म्हणून मुद्दा क्रमांक १ व २ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ३ बाबत** –

९. मी यापुर्वीच मुद्दा क्र. १ व २ ला नकारार्थी उत्तर दिले असल्याने, आरोपीची निर्दोष मुक्तता करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. आरोपी विजेंद्र विजय गावंड, यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७१ (१) अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (४) व ३०५ अन्वये नुसार शिक्षापात्र असलेल्या गुन्हयांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. त्याला सोडून देण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल १७.६९० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड, एक ३०० मिली वजनाची सोन्याची नथ हे मुळ मालक फिर्यादी यास परत करण्यात आले असल्याने त्याबाबत कोणताही आदेश नाही.

जप्त मुद्देमाल हिरो कंपनीची निळ्या काळ्या रंगाची स्प्लेंडर क्र. एमएच–४६–सीएस–३९६३, चेसिस नंबर BLHAW222R5D80849 व इंजिन नं. HA11E8R5D00589 ही मुळ मालकास परत मिळाली असल्याने त्याबाबत देखील कोणताही आदेश नाही.

तसेच जप्त मुद्देमाल भारत गॅस कंपनीचे एक सिलेंडरची टाकी ही अपिल कालावधीनंतर मुळ मालकास पडताळणीनंतर परत करण्यात यावी.

३. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

४. आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ मधील तरतुदीप्रमाणे रक्कम रूपये १५,०००/– चा जामीन द्यावा. तो जामीन सहा महिन्यांकरीता असेल.

५. आरोपीला खुले करण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

सही/-

उरण,
(एम. एस. काझी)

दिनांक – १३.०३.२०२६
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण